Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# छत्रपती शिवाजी महाराजांचा जल व पर्यावरण विषयक दृष्टीकोन

**प्रा. डॉ. निशांत भिमरावजी शेंडे,** पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग, नंदुरबार तालुका विधायक समितीचे, गजमल तुळशीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार

### प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराज राज्यसंस्थापक होते. त्यांना राज्य वारसा हक्काने मिळालेले नव्हते. आयत्या पिठावर रेघोट्या मारणारे ते नव्हते. स्वतःच्या कर्तुत्वाने, असामान्य धैर्य, जिद्द व चिकाटीच्या बळावर त्यांनी दक्खनमध्ये हिंदवी स्वराज्याची स्थापना केली होती. तत्कालीन परिस्थितीत स्वराज्य स्थापण करणे म्हणजे साधारण बाब नव्हती. परंतु  छत्रपती शिवाजी महाराजानी ही बाब पूर्णत्वास आणली. राज्य स्थापण करणारे शिवाजी महाराज पहिले राजा नव्हते. काही आणखीन होते, परंतु लोंकाच्या मनात शिवाजी महाराजांना जे स्थान मिळाले ते इतरांना मिळू शकले नाही.

त्यांनी राज्य निर्मितीच्या कार्यात सर्व जाती, धर्माच्या लोंकाचे सहकार्य घेतले. शिवाजी महाराज सर्व धर्मांचा सम्मान करत होते. त्यांच्या धार्मिक धोरणात भेदभावपूर्ण व्यवहाराला कुठलेही स्थान नव्हते. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत. भारताच्या सुपीक भूमीमध्ये अनेक हिंदू सम्राट होऊन गेले. पण लोकांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराजांना जे स्थान निर्माण करता आलं. ते स्थान इतर हिंदू राजांना निर्माण करता आलं नाही. कारण त्यांच्या वर्तनामध्ये, व्यवहारांमध्ये इतर हिंदू राजांपेक्षा वेगळा असा भाव होता. ते लोककल्याणकारी, प्रजाहितदक्ष असे राजा होते. रयतेची आपल्या मुलाप्रमाणे काळजी करणारे होते. राजा आणि प्रजा यांच्यामध्ये कुठलाही मध्यस्थ नव्हता. त्यामुळे आपल्या रयतेच्या हृदयात ते एक वेगळं स्थान निर्माण करू शकले. भारत भूमीमध्ये अनेक महान सम्राट उदयास आले त्यांनी आपल्या कर्तबगारीने, पराक्रमाने व शौर्याने संपूर्ण भारत भूमीमध्ये आपल्या अफाट अशा साम्राज्याचा विस्तार केला. आपलं वेगळं स्थान भारत या देशात निर्माण केलं.  अशा सम्राटांमध्ये चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक, सम्राट अकबर, इत्यादी महान राज्यकर्ते उदयास आले. या महान राज्यकर्त्यांच्या पंक्तीमध्ये बसण्याचा मान अखिल महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना मिळाला. छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यात दुर्गाला अनन्यसाधारण महत्व होते. दुर्ग हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते. दुर्ग म्हणजे किल्ले. प्राचीन काळापासून दुर्गचे संदर्भ प्रकर्षाने दिसून येतात. ऋग्वेदात दुर्गाला पूर हा शब्दप्रयोग केलेला आढळून येतो. तर अमरकोशातही दुर्ग असे म्हटलेले आहे. अग्निपुरणात सहा प्रकार दुर्गाचे प्रकार सांगण्यात आले आहे. त्यामध्ये घनदुर्ग, महिदुर्ग, अब्द्दुर्ग, वृक्षदुर्ग, नृदुर्ग, गिरिदुर्ग इत्यादी.

**बिजशब्द** : जल, पर्यावरण, लोककल्याण

### संशोधनाची उदिष्टे

१. शिवकालीन जलव्यवस्थापन तंत्राचे अध्ययन करणे.
२. छत्रपती शिवाजी महाराजांचा पर्यावरण विषयक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
३. शिवकालीन शेतीच्या जलसिंचनाच्या व्यवस्थेचा अभ्यास करणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
**Volume 15, Issue 1, Jan-March – 2025** Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

४. शिवाजी महाराजांनी पाण्याचे महत्व ओळखून आपल्या स्वराज्यात विहिरी, तळी, बंधारे यांना कशाप्रकारे प्रोत्साहन दिले या घटकाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तुत्वावर विपुल प्रमाणात लेखन झाले आहे. परंतु संशोधकाच्या संशोधकीय नजरेतून त्यांचा जल व पर्यावरणाच्या संदर्भातील दृष्टीकोन हा त्यांच्या कार्यातील महत्वाचा पैलू दुर्लक्षित राहिलेला दिसून येतो. छत्रपती शिवरायांनी आपल्या स्वराज्यातील रयतेची काळजी तर केलीच. शिवाय पाणी, शेतकरी, वृक्ष या संदर्भात देखील शिवकाळात प्रामुख्याने विचार करण्यात आल्याचे लक्षात येते. सदर संशोधनाकरिता प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधने, याशिवाय मासिके व वृत्तपत्रातील लेख इत्यादी साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज यांचा जल व पर्यावरण विषयक दृष्टीकोन**

छत्रपती शिवरायांचे स्वराज्य लोककल्याणकारी होते. आपल्या स्वराज्यातील प्रजेचे हित व सुरक्षा यांना प्राधान्य देणारे ते प्रजाहितदक्ष सम्राट होते. त्यांनी सदैव शेतकऱ्यांचे सर्वांगीण हित व सुरक्षा याला प्राधान्य दिले. त्यांनी जसे प्रजेचे हित जोपासले. तसेच स्वराज्यातील रयतेच्या सर्वांगीण समृद्धीसाठी, प्रगतीसाठी पाणी आवश्यक आहे. याची देखील जाणीव त्यांना प्रकर्षाने होती. आपल्या स्वराज्यात त्यांनी पाण्याचे जतन व संवर्धनाला मोठ्या प्रमाणात महत्व दिले होते. पाण्यासंदर्भातील त्यांचा दृष्टीकोन हा दूरदर्शी स्वरूपाचा होता. शिवरायांनी दुर्गासोबत पाण्याला मोठ्या प्रमाणात महत्व दिले होते. राज्याचे सार ते दुर्ग असं म्हणणारे रामचंद्रपंत अमात्य यांनी 'आज्ञापत्र' या ग्रंथाची रचना केली. या ग्रंथातून अमात्य शिवरायांच्या दृष्टीकोनातून दुर्गावरील पाणी आणि पाण्याचे व्यवस्थापन याबद्दल काय दृष्टीकोन होता, हे सांगतांना म्हणतात, "गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि ते स्थळ तो अवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी, टाकी प्रजन्यकाळपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे अशी मजबूत बांधावी. गडावरी झराही आहे. जसे तसे पाणीही पुरते, म्हणून तितकीयावरीच निश्चिंती न मानावी. किनिमित्य किं, झुंजामध्ये भांडीयांचे आवाजाखाली झरे स्वल्प होतात, आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो, तेव्हां संकट पडते. याकरिता तसे जागी जखीरीयाचे पाणी म्हणून दोन चार टाकी तळी बांधावी. त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे, गडाचे पाणी बहुत जतन राखावे."[१]

यावरून शिवरायांचा गडावरील जल व्यवस्थापनाचा दृष्टीकोन किती दूरदर्शी होता हे प्रकर्षाने लक्षात येते. गडाची बांधणी करायची असेल तर पाणी हे सर्वात महत्वाचे आहे. गडावर शिबंदी, दारुगोळा, धनधान्य हे जरी मुबलक प्रमाणात असले तरी पाण्याचा अपूर्ण साठा असेल तर गड आक्रमकांशी तेवढ्या क्षमतेने भांडू शकत नाही. त्यामुळे गड बांधण्यापूर्वी पाण्याची पहिल्यांदा तजवीज करावी. हा शिवरायांचा जलविषयक दृष्टीकोन अत्यंत महत्वाचा होता.

आज राष्ट्रासमोरील सर्वात ज्वलंत समस्या पाणी समस्या आहे. भारताचे जलपुरुष मानले जाणारे राजेंद्र सिंह असे म्हणतात, 'तिसरे महायुद्ध हे पाण्यासाठी लढले जाईल' यावरून मानवी जीवनात पाणी किती महत्वाचे आहे याची प्रचीती खऱ्या अर्थाने आपणास येते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताच्या बहुतांश लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. परंतु देशातील बहुतांश शेतकऱ्यांची शेती नैसर्गिक पाण्यावर अवलंबून असल्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होते. परिणामतः देशासमोर अन्नधान्याची


Copyright © | JET Network, All Rights Reserved

टंचाई ही समस्या निर्माण होते. या समस्येवर उपाय आणि धोरणे तयार करायची असेल तर शिवकालीन जलव्यवस्थापनेचे तंत्र समजून घेणे आवश्यक आहे.

शिवाजी महाराजांकडे पर्यावरण दृष्टीकोन अत्यंत प्रगल्भ स्वरूपाचा होता. भौगोलिक स्थितीचे ज्ञानही त्यांना होते. गडावर जिवंत पाण्याचे झरे असत. त्यासाठी खडकात टाकी खोदून पाण्याची व्यवस्था केलेली दिसून येते. रायगडावर एकूण आठ तलाव असल्याचे प्रकर्षाने दिसून येतात. गंगासागर तलाव, कोळीम तलाव, हत्ती तलाव, काळा तलाव, कुर्शावत तलाव आणि वापरात नसलेले तीन तलाव आहेत.[२]

पिण्याच्या पाण्यासाठी या तलावांचा उपयोग करण्यात येत असे. या तलावांपैकी गंगासागर तलाव सर्वात मोठा होता. गडावर शिवाजी महाराजांनी पाण्याला किती मोठ्या प्रमाणात महत्व देण्यात आले होते. हे प्रकर्षाने लक्षात येते. रायगडावर खडकात खोदलेले अंडाकृती तळे खोदलेले प्रकर्षाने आढळून येते. यास हत्ती तलाव असे संबोधले जाते. तेथूनच १०० यार्ड अंतरावर खडक खोडून गंगासागर तलाव बनवलेला आहे. शिवकाळात या तलावाचे पाणी शिबंदीसाठी वापरण्यात येत असे.

शिवाजी महाराज लोककल्याणकारी राजे होते. त्यांनी ज्याप्रमाणे कुटुंबप्रमुख म्हणून आपल्या रयतेच्या हिताची व सुरक्षेची काळजी घेतली, त्याप्रमाणे आपल्या स्वराज्यातील झाडे, पिक, पाणी यांचे देखील जतन व संवर्धन केले. शिवाजीराजे आज्ञापत्रात वृक्षांचे महत्व प्रतिपादित करतात. वृक्ष ही पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी महत्वाचे आहेत ही भूमिका क्षत्रपती शिवरायांची होती. रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिलेल्या 'आज्ञापत्र' या ग्रंथात झाडांचे महत्व सांगणाऱ्या आदेशांचा उल्लेख आलेला आहे. शिवाजी महाराज सांगतात, गडाची राखण म्हणजे कलारग्याची झाडी, ते झाडी प्रयत्ने वाढवावी. त्यामध्ये एक काठीही तोडो न द्यावे.[३]

"गडावरी झाडे जी असतील ती राखावी. याविरहित जी जी झाडे आहेत ती फणस, चिंचा, वड, पिंपळ आदिकरून थोर वृक्ष, निंबे, नारिंगे, आदिकरून लहान वृक्ष, तसेच पुष्पवृक्ष वल्ली किंबहुना प्रयोजक अप्रयोजक जे झाड होत असेल ते गडावर लावावे, जतन करावे."[४]

आज सर्रासपणे विकासाच्या नावाखाली वर्षानुवर्ष वाढवलेली, जतन व संवर्धन केलेली वृक्षांची कत्तल मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे वृक्ष कत्तलीचा परिणाम प्रजन्यवृष्टीवर होऊन दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी होत आहे. देशाची संपत्ती असलेली जंगले बिनदिक्कतपणे तोडली जात आहेत. अशा वेळेस शिवकाळातील वृक्षासंबंधीचा दृष्टीकोन किती काळाच्या पुढे होता हे प्रामुख्याने लक्षात येते. रयतेच्या सर्वांगीण कल्याणासाठी मुबलक प्रमाणात पाऊस आवश्यक आहे याची जाणीव खऱ्या अर्थाने शिवरायांना होऊन त्यांनी आपल्या स्वराज्यात वृक्ष लागवडीला व वृक्षांच्या जतन व संवर्धनाला मोठ्या प्रमाणात उत्तेजन दिले. गडावर आधीपासून जी झाडे असतील त्यांना जतन करावे. त्यांना कुठलीही बाधा पोहचू नये. ती झाडे उपयोगाची असोत किंवा नसोत तरी त्या झाडांची कत्तल करू नये. वेगवेगळया झाडांची, फुलांची व वेलीच्या झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड करा. केवळ झाडे लावून थांबू नका तर त्यांची व्यवस्थितपणे निगा राखून त्यांचे आपल्या स्वतःच्या लेकराप्रमाणे जतन व संवर्धन करा, झाडामुळे पाऊस चांगला होतो, पर्यावरणाचा समतोल चांगला राखला जातो, फळे, फुले मिळतात. गडाचे रक्षण होते, आयुर्वेदिक औषधी वनस्पतींची प्राप्ती होते. अशी पर्यावरणा संदर्भातील शिवाजी महाराजांची भूमिका होती. तत्कालीन राज्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या या वृक्ष जतन व संवर्धनाच्या धोरणापासून बोध घेणे आवश्यक आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरणाची भूमिका ही लोककल्याणकारी स्वरुपाची होती. झाडे ही आरमार व प्रजन्यमानासाठी आवश्यक असतात. स्वराज्याच्या हितसंवर्धनात त्यांची भूमिका अनन्यसाधारण महत्वाची असते. झाडे ही एका दिवशी तयार होत नाहीत. स्वराज्यातील रयतेने मोठ्या कष्टाने ती लावलेली असतात आणि आपल्या मुलाबाळाप्रमाणेच झाडांचे जतन आणि संवर्धन केलेले असते. एवढ्या कष्टाने वाढवलेली झाडांची कोणी कत्तल केली तर रयतेला होणारे दुखः किती मोठे असेल याची जाणिव शिवरायांना होती. म्हणून शिवाजी महाराज अशी आज्ञा देतात कि, आपले राज्यांत अरण्यात सागवानादी वृक्ष आहेत त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहित जे लागेल ते परमुलखीहून खरेदी करून आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरून हे देखील लाकडे आरमाराच्या प्रयोजनाची, परंतु त्यास हात लावू देवू नये. काय म्हणोन, कि, ही झाडे वर्षा दोन वर्षांनी होतात असे नाही. रयतांनी ही झाडे लावून लेकरासारखी बहुत काळ जतन करून वाढविली. ती झाडे तोडील्यावर त्यांचे दु:खास पारावर काय?[५]

छत्रपती शिवरायांनी ज्या पद्धतीने आपल्या स्वराज्यातील रयतेची काळजी केली. त्यांचा सर्वांगीण कल्याण करणे हेच जीवितध्येय त्यांनी निश्चित केले होते. रयतेच्या कल्याणाची तळमळ, कळकळ त्यांच्या हृदयात मोठ्या प्रमाणात होती. आपल्या लेकराप्रमाणे ते रयतेची काळजी करीत असत. त्यांच्या स्वराज्यात संपूर्ण रयत आनंदी होती. त्यांच्या स्वराज्याची उभारणी समतेच्या तत्वावर झालेली होती. त्यांनी कधीही विषमतेचा व भेदभावाचा व्यवहार केला नाही. आपल्या स्वराज्यातील सर्व जात, वर्ग समूहांना समान न्याय दिला. शिवकाळातील शेतकरी अत्यंत आनंदी होता. शेतकरी सुखी तर, प्रजा सुखी आणि प्रजा सुखी तर राजा सुखी असे शिवाजी महाराज म्हणत असत. आपल्या स्वराज्यातील शेतक-याबद्दल मानवतावादी दृष्टीकोन शिवाजी महाराजांचा होता.

शिवकाळातील शेती ही बहुतांश नैसर्गिक पाण्यावर आधारित होती. स्वराज्याचे उत्पन्न शेतातील उत्पन्नावरच आधारित असे. शेतातून विविध प्रकारचे उत्पन्न घेतल्या जात असे. शिवकाळात शेतीसाठी बी, बियाणे, खते, शेतीची अवजारे, पाणी व महसूल याचा प्रकर्षाने विचार केलेला दिसून येतो. "उद्वस्त झालेली गावे शिवाजी महाराजांनी कौलनामे देऊन पुन्हा वसवली. नव्याने जमीन कसायला घेणारयांना बी-बियाणे देऊन व औतफाट्यास मदत करून शेती कसायला प्रोत्साहन दिले. नवीन लागवडीस आणलेल्या जमिनींना सुरुवातीची ४-५ वर्ष महसूल देखील कमी ठेवला."[६]

आपल्या मर्जीप्रमाणे रयतेकडून जमीन महसूल वसूल करण्यावर शिवाजी महाराजांनी निर्बंध आणले. मोजलेल्या जमिनीचा महसूल निश्चित केला. ठरलेला महसुलच वसूल करण्याचा दंडक घालून दिला व तो अमलात आणला. दुष्काळाच्या, नैसर्गिक आपत्तीच्या काळात शिवरायांनी शेतक-यांच्या जमीन महसूल माफ केला. उलट दुष्काळाच्या काळात शेतक-यांना स्वराज्याच्या वतीने सर्व बाबतीत मदत केल्या जात असे. रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये. "सैन्यातील घोड्यांना दाणा-वैरण लागली तर रोख रक्कम देऊन खरेदी झाली पाहिजे."[७]

सैन्याचा रयतेला कुठलाही त्रास होता कामा नये.' अशा सक्त आज्ञा शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांना दिल्या होत्या. आणि केवळ ते सूचना देऊन थांबले नाहीत तर त्या आज्ञांची त्यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी केली. छत्रपती शिवाजी महाराजांना रयतेची कणव होती. त्यामुळे रयतेला हे स्वराज्य आपलं वाटायचं. कुठल्याही प्रकारचा त्याग आणि समर्पण स्वराज्याच्या हितासाठी करण्याची तयारी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

रयतेची होती. म्हणूनच बांधावरून जाणाऱ्या शस्त्रसज्ज घोडेस्वारांना एक शेतकऱ्याच्या कोवळया वयातील पोरगा दम देतांना म्हणतो,

**खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या उडवीन राई राई एवढ्या....**

इतकी स्वराज्याबद्दल आत्मीयता छत्रपती शिवाजी महाराज आपल्या प्रजेमध्ये निर्माण करू शकले. रयतेला हे स्वराज्य आपल वाटायचं. शिवकाळात शेती, शेतकरी, शेतीच्या जलसिंचनाची व्यवस्था यावर कटाक्षाने लक्ष देण्यात आल्याचे प्रकर्षाने दिसून येते. जलसिंचनासाठी पाणी कुठेही कमी पडू नये म्हणून छत्रपती शिवाजी महाराज स्वतः दक्ष असत. म्हणून त्यांनी शेतकऱ्यांना आपल्या शेतात विहिरी खोदण्यास मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले होते. शिवरायांनी आपल्या राज्यात तळी, बंधारे व धरणे बांधून शेतीच्या पाटाच्या पाण्याची व्यवस्था निर्माण केली होती. शिवाजी महाराजांनी अनेक ठिकाणी तळी खोदकाम करून शेतीच्या पाण्याचा प्रश्न मिटविला होता.'[८]

शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात पाण्याचे व्यवस्थितरीत्या नियोजन केले होते. शेतकरी आणि स्वराज्याच्या हितासाठी पाण्याचे महत्व शिवाजी महाराजांनी ओळखले होते. स्वराज्य व शेतीच्या कल्याणाकरिता त्यांनी आपल्या स्वराज्यात विहिरी, तळी, बंधारे बांधण्याला उत्तेजन दिले. शेतकऱ्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी त्यांना मोफत योजना देण्यापेक्षा शेतीच्या उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना मुबलक स्वरुपात पाणी देणे आवश्यक आहे. याची जाणीव शिवरायांना होती. तशा स्वरुपाची लोककल्याणकारी धोरणे त्यांनी तयार केली. आणि ती आपल्या स्वराज्यात राबविली.

**निष्कर्ष**

सध्याच्या काळात संपूर्ण देशामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. बहुतांश शेती ही नैसर्गिक पाऊसावर अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव नाही, जास्तीत जास्त शेती सिंचनाखाली आणण्यासाठी सरकारतर्फे योग्य धोरणे राबविली जात नाही. या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांनी छत्रपती शिवरायांच्या शेती, शेतकरी, पाणी व जलसिंचना संदर्भातील धोरणापासून बोध घेणे आवश्यक आहे. राज्यकर्त्यांनी शिवरायांची ही धोरणे जर राज्यात अमलात आणली तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना आत्मनिर्भर, स्वावलंबी बनविण्यास मदत होईल.

**संदर्भ साधने**

१. खोले विलास (संपादक), आज्ञापत्र' लोकवाङ्मय प्रकाशन मुंबई, प. आ. १९८८, पृ. क्र ८१, ८२
२. आवळस्कर शांताराम विष्णू, 'रायगडाची जीवनकथा', (२०१५) महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई. पृ. क्र. १९.
३. तत्रैव पृ. क्र. ८१.
४. तत्रैव पृ. क्र. ८३.
५. तत्रैव पृ. क्र. ८८.
६. पानसरे गोविंद, 'शिवाजी कोण होता', लोकवाङ्मय गृह प्रकाशन मुंबई प. आ. एप्रिल १९८८, पृ. क्र. १०
७. देशपांडे. प्र. न., 'छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे', सुषमा प्रकाशन धुळे, प.आ. १७ मार्च १९८३ पृ. क्र. १९७-१९८
८. हरदास बाळशास्त्री, छत्रपती शिवाजी महाराज भाग ४, (१९७६) काळ प्रकाशन पुणे, पृ. क्र. ६४.


Copyright © | JET Network, All Rights Reserved